# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र.बीएम-७७३/२०२४**

**अपिलार्थी श्री. मंगल एम काटवटे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-३ (पश्चिम)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन,
कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, रुम नं.५३७, ४ था मजला,
गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

| द्वितीय अपील आदेश दिनांक | तक्रार दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याकडून मागविण्यात आलेल्या अहवाल पत्र दिनांक | जन माहिती अधिकाऱ्यांचा अहवाल दिनांक |
|---|---|---|---|
| - | ११.११.२०२४ | ०६.०८.२०२६ | २०.०८.२०२६ |

तक्रारकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये आयोगाकडे दि. ११.११.२०२४ तक्रार दाखल केली आहे.

२. सदर तक्रार अर्जात त्यांनी असा उल्लेख केला आहे की, “अंधेरी पश्चिम वार्ड क्र.७० क्षेत्रात वेगवेगळया ठिकाणी बसण्याची व्यवस्था आणि बॅचेसची व्यवस्थेची कामे सौंदर्यीकरण निधी वापरुन आमदार अमित साटम यांच्यावतीने झाले आहे. बील पास झाले त्याबाबत दि.०९.०२.२०२४ रोजी अर्ज देऊन माहिती मागितली आहे त्याचे उत्तर दि.०४.०३.२०२४ रोजी मिळाले. दिशाभूल करणारे मिळाल्यावर दि.१९.०३.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल करण्यास आली. अपीलाची सुनावणी दि.०५.०४.२०२४ रोजी मा. कार्यकारी अभियंता, पश्चिम यांच्या दालनात झाली त्याच्यामध्ये अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती १५ कार्यालयीन दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी परंतु आजपर्यंत कोणती ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात आले नाही याच्यामध्ये माहिती अधिकाराचे उल्लंघन झाले. याबाबत दि.१५.०५.२०२४ रोजी मार्गदर्शन अर्ज देण्यात आले तरी ही माहिती देण्यात आली नाही म्हणजे येथे हम करे सो कायदा सुरु आहे. आपणांस विनंती आहे की, माहिती न देणारे मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे उप अभियंता / जन माहिती अधिकारी-३ यांच्यावर कलम १८ (१) अन्वये कारवाई करुन माहिती देण्याचे आदेश देण्यात यावा.”

३. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता-३ यांच्याकडून दि.०६.०८.२०२६ च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-३ (प) यांनी आयोगास दि.२०.०८.२०२६ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. त्याद्वारे त्यांनी खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

- अर्जदार श्रीमती मंगल सु. काटवटे यांनी दिनांक ०९.०२.२०२४ रोजी माहिती अधिकार अधिनियम अन्वये अर्ज सादर करुन अंधेरी पश्चिम वार्ड क्र. ७० क्षेत्रात वेगवेगळया ठिकाणी बसण्याची व्यवस्था आणि बँचेस लावण्याच्या कामाबाबतची माहिती मिळणेची मागणी केलेली होती.

- सदर माहिती बाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र.४२४९ दिनांक ०४.०३.२०२४ नुसार अर्जदारास आपण मागणी केल्यानुसार आपणांस हवी असलेली नस्ती ही महापेला पाठविलेली असल्याने सदर नस्ती मागविण्यासाठी सुमारे १० ते १५ दिवसांचा कालावधी लागू शकतो. हयास्तव आपणांस कळविण्यात येते की, सदर नस्ती उपलब्ध झाल्यावर आपणांस दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल, व आपणांस हव्या असलेल्या छायांकितप्रती या कार्यालयास झेरॉक्स मशिन उपलब्ध नसल्याने स्वखर्चाने काढून घेण्यात याव्यात कृपया याची नोंद घ्यावी असे कळविण्यात आले होते.
- अर्जदाराने या कार्यालयात येवून या उपविभागास भेट न देता दि.०६.०३.२०२४ रोजी तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पश्चिम विभाग, मुं.झो. सु. मंडळ यांचाकडे प्रथम अपील दाखल केले,
- तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पश्चिम विभाग, मुं.झो.सु. मंडळ यांनी दिनांक ०४.०४.२०२४ रोजी प्रथम अपीलावर सुनावणी घेतली व आदेश जारी केले की, जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागितलेली माहिती महापे वरून मागविण्यात यावे अथवा सदर माहिती स्कॅनिंग झाली असेल तर सदर माहिती सीडी स्वरूपात अथवा पेनड्राईव्ह मध्ये १५ दिवसात उपलब्ध करून दयावी. असे आदेश दिले.
- तदनंतर अर्जदार श्रीमती मंगल सु. काटवटे यांना तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी पत्र क्र.९१३८ दि. १३.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास उपस्थित राहून आपणांस हवी असलेल्या नस्तीचे निरीक्षण करण्यासाठी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपस्थित राहावे असे कळविण्यात आले होते.
- तदनंतर दि. ०५.०६.२०२४ रोजी अर्जदाराने या कार्यालयात भेट दिल्यानंतर त्यांना हवी असलेली माहिती ही सीडी स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
- तथापी अर्जदार यांनी माहिती मिळाली असताना देखील दि.११.११.२०२४ रोजी मा. राज्य माहिती आयोग यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तरी मा. आयोगास विनंती करण्यात येते की, तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी संबंधित अर्जदारास आवश्यक माहिती उपलब्ध करून दिलेली असल्याने निम्नस्वाक्षरीकार यांचा वरीलप्रमाणे अभिप्राय मान्य करुन अर्ज निकाली काढावा हि विनंती.

४. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास अभिलेखावरील उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. त्यामूळे सदर प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १८(२) अन्वये अधिक/ सखोल चौकशी करण्याची आवश्यकता नाही, असा निष्कर्ष काढून आयोग पुढील आदेश देत आहे :

**आदेश**

**उपरोक्त विवेचनासह तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

31-8-2026

**मुंबई**
**दिनांक : ३१.०८.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**